# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ११८ वा ❑ गुरूवार दि.१९ जून २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## विमानांची सुरक्षा तपासणी अनिवार्य करण्याची गरज

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

अहमदाबादमधील एअर इंडियाच्या विमान अपघातात २६५ पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर संपूर्ण देशभरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर केंद्र सरकार अलर्ट झालं असून पुन्हा अशा स्वरुपाच्या घटना घडू नये, यासाठी आता पावलं उचलले जात आहेत. या पार्श्वभूमीवरच आता डीजीसीएने महत्वाचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. डीजीसीएच्या आदेशानुसार आता बोईंग ७८७ ड्रीमलायनर या विमानांची उड्डाणापूर्वी संपूर्ण सुरक्षा तपासणी अनिवार्य करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.याचाच अर्थ या आधी विमानाची सुरक्षा तपासणी होत नव्हती का? या आधी देखील विमानांचे अपघात झालेले आहेत. त्या अपघातांपासून केंद्र सरकार किंवा नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने काहीच बोध घेतला नाही का? एखादी भयंकर घटना घडल्यानंतरच संबंधित विभागाला जाग येतो. अशा दुर्घटना होत असताना संबंधित विभाग अलर्ट मोडवर असायला पाहिजे. मात्र घटनेचे गांभीर्य कोण घेणार? हा खरा प्रश्न आहे.

अहमदाबाद येथील भीषण विमान दुर्घटनेनंतर सरकारला जाग आली. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) दिलेल्या या आदेशानंतर बोईंग ७८७ विमानांच्या अनिवार्य सुरक्षा तपासणी सुरु करण्यात आल्याचं एअर इंडियाने म्हटलं आहे. त्यामुळे एअर इंडियाने विमानांच्या विलंबाचा इशारा देखील दिला आहे. डीजीसीएने निर्देशित केलेल्या सुरक्षा तपासणी पूर्ण करण्याच्या प्रक्रियेत एअरलाईन्स असून पुढील ऑपरेशन्ससाठी परवानगी देण्यापूर्वी बोईंग ७८७ विमानांची ही तपासणी केली जात असल्याचं एअर इंडियाने म्हटलं आहे.

दरम्यान, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने जेनएक्स इंजिनने चालणाऱ्या सर्व ड्रीमलाइनर्सची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये विमानांच्या उड्डाणापूर्वी संपूर्ण सुरक्षा तपासणी, इंधन पॅरामीटर देखरेख आणि संबंधित सिस्टमची तपासणी, केबिन एअर कॉम्प्रेसर आणि संबंधित सिस्टमची तपासणी, इलेक्ट्रॉनिक इंजिन नियंत्रण प्रणाली चाचणी, हायड्रॉलिक सिस्टमची तपासणी, टेक-ऑफ पॅरामीटर्सची तपासणी करण्याचे निर्देश डीजीसीए दिले आहेत.

अहमदाबाद येथील विमान दुर्घटना अतिशय भीषण होती. या घटनेमुळे २६ एप्रिल १९९३ साली शहरात झालेल्या घटनेला उजाळा मिळाला. इतिहासात पहिल्यांदाच विमान आणि ट्रकची धडक झाली. या धडकेत विमानाचे तीन तुकडे होऊन त्यात राज्यातील नामांकित उद्योजकांचा आणि प्रसिद्ध व्यक्तींचा मृत्यू झाला होता. विमान अपघाताच्या अशा घटना घडत असताना संबंधित विभाग व सरकार दक्ष असायला पाहिजे. मात्र कुठेतरी कमतरता कुठं तरी जाणवते.विमान अपघात रोखण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जातात, ज्यात तांत्रिक प्रगती, कडक सुरक्षा प्रोटोकॉल आणि वैमानिक आणि हवाई वाहतूक नियंत्रकांचे प्रशिक्षण यांचा समावेश आहे. अपघात टाळण्यासाठी विमाने आधुनिक नेव्हिगेशन आणि कम्युनिकेशन सिस्टम तसेच टक्कर टाळण्याची प्रणाली () वापरतात.

विमानांमध्ये प्रगत नेव्हिगेशन आणि कम्युनिकेशन सिस्टीम वापरल्या जातात जेणेकरून वैमानिकांना अचूक मार्गदर्शन मिळेल आणि ते सुरक्षितपणे उड्डाण करू शकतील. टक्कर टाळण्याची प्रणाली (): ही एक अशी प्रणाली आहे जी विमानांना एकमेकांशी टक्कर टाळण्यास मदत करते. ही प्रणाली विमानांना एकमेकांच्या स्थितीबद्दल माहिती देते आणि टक्कर टाळण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन देते.

ब्लॅक बॉक्स: विमानात एक ब्लॅक बॉक्स बसवला जातो जो उड्डाणादरम्यान घडणारी महत्त्वाची माहिती नोंदवतो. अपघात झाल्यास, ब्लॅक बॉक्सच्या मदतीने अपघाताची कारणे शोधली जातात.

सुरक्षा प्रोटोकॉल:

सुरक्षा ब्रीफिंग: विमानात चढण्यापूर्वी, प्रवाशांना सुरक्षा ब्रीफिंग दिली जाते ज्यामध्ये आपत्कालीन प्रक्रिया आणि सुरक्षा खबरदारीबद्दल माहिती दिली जाते.

सीट बेल्ट: प्रवाशांना नेहमीच त्यांचे सीट बेल्ट बांधण्याचा सल्ला दिला जातो जेणेकरून ते आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षित राहतील. आपत्कालीन परिस्थितीत संयम: आपत्कालीन परिस्थितीत, प्रवाशांनी संयम आणि समजूतदारपणे वागले पाहिजे जेणेकरून ते सुरक्षित राहू शकतील आणि इतरांना मदत करू शकतील. वैमानिक आणि हवाई वाहतूक नियंत्रकांचे प्रशिक्षण: कठोर प्रशिक्षण: वैमानिक आणि हवाई वाहतूक नियंत्रकांना विमाने उडवण्यात आणि हवाई वाहतूक नियंत्रित करण्यात प्रवीण होण्यासाठी कठोर प्रशिक्षण दिले जाते. नियमित प्रशिक्षण: वैमानिक आणि हवाई वाहतूक नियंत्रकांना नियमित प्रशिक्षण दिले जाते जेणेकरून ते नवीनतम तंत्रज्ञान आणि प्रक्रियांबद्दल अद्ययावत राहू शकतील. इतर उपाय: हवामान परिस्थिती: वैमानिकांनी हवामान परिस्थितीची काळजी घेतली पाहिजे आणि खराब हवामानात उड्डाण करणे टाळले पाहिजे. यांत्रिक त्रुटी दूर करणे: वैमानिकांनी यांत्रिक त्रुटी वेळेत दुरुस्त केल्या पाहिजेत जेणेकरून त्या अपघातास कारणीभूत ठरू नयेत. विमानांची नियमित देखभाल: विमाने सुरक्षितपणे उड्डाण करण्यासाठी नियमितपणे देखभाल केली पाहिजे. या सर्व उपायांना एकत्रित करून, विमान अपघातांचा धोका कमी केला जाऊ शकतो.या सर्व उपायांचा अवलंब करून विमान दुर्घटनेनंतर मात करता येऊ शकतो.मात्र या सर्व सुरक्षा पर्यायांची अंमलबजावणी होत असते का? अर्थात या उपाय योजनांचा विचार होत नसल्याने विमान दुर्घटना होत असतात.

# तुका म्हणे माझे हे चि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीने ॥

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – वारी म्हणजे वारकरी भक्तांनी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर पर्यंत केलेली पदयात्रा होय. साधारणपणे आठशे वर्षा पुर्वी सुरू झालेली ही परंपरा ऊन, वारा, पाऊस काहीही असो अखंड चालू आहे.

शुभ पांढरे वस्त्रे परिधान करून, भगवी पताका खांद्यावर घेऊन, कपाळावर उभे गंध, बुक्का लावून, गळ्यात तुळशीच्या माळा घालून, हातातील टाळ तालात वाजवत, नाचत डोलत आनंदाने वारी सोबत विठोबाच्या दर्शनाला जाणे यापेक्षा वारकऱ्यांना दुसरा आनंद तो कोणता? फक्त वारकरीच नव्हे तर सर्व जाती धर्मातील भाविक, भक्त वारकरी होऊन या आनंदाच्या यात्रेत, सुखाच्या सोहळ्यात तल्लीन होऊन ग्यानबा तुकारामाच्या घोषात वारी करत असतात.

सामाजिक सांस्कृतिक व आध्यात्मिक भान जोपासण्यासाठी ही वारी एकदा तरी आयुष्यात करावी ही भावना प्रत्येकाची असते.

खरंच किती श्रद्धेने, आनंदाने ही सारी मंडळी त्या विठोबाच्या दर्शनाला जात असते.

विठ्ठलाला डोळे भरून पाहत असते. यानिमित्ताने संत तुकारामाचा एक अतिशय सुंदर असा अभंग मला आठवतो. तो म्हणजे,

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी
कर कटावरी ठेवूनिया
तुळसीहार गळा कासे पीतांबर
आवडे निरंतर ते चि रूप
मकर कुंडले तळपती श्रवणी
कंठी कौस्तुभमणि विराजित
तुका म्हणे माझे हे चि सर्व सुख
पाहीन श्रीमुख आवडीने

विठ्ठलाचे दर्शन झाल्यावर वरील अभंगात संत तुकाराम म्हणतात, कमरेवर हात ठेवून विटेवर उभ्या असलेल्या विठोबाचे सावळे रूपअतिशय सुंदर आहे, देखणे आहे.

त्या विठ्ठलाच्या गळ्यात तुलसी माळा, कमरेला पिवळा जर्द पीतांबर आहे, कानात माशाच्या आकाराचे कुंडल झळकते आहे .असे हे विठ्ठलाचे सुंदर ध्यान मला निरंतर आवडते आणि अश्या विठोबाला पाहणे माझ्या जीवनातील सर्वात मोठे सुख आहे. हे श्रीमुख मी सतत आवडीने पहात राहील. मला विठोबाला सोडावसे वाटत नाही, असा हा विठ्ठल माझ्या भाग्याचा झाला आहे.




खरं तर जितका सुंदर विठ्ठल, तितकाच सुंदर असा हा अभंग संत तुकाराम महाराजांनी रचला आहे.

एका दुसऱ्या सुंदर अभंगात संत तुकाराम महाराज म्हणतात,

पंढरीसी जावे ऐसे माझे मनी
विठाई जननी भेटे केंव्हा
न लागे त्याविण सुखाचा सोहळा
लागे मज ज्वाळा अग्निचिया
तुका म्हणे त्याचे पाहीलिया पाय
मग दुःख जाय सर्व माझे

संत तुकाराम महाराजांना विठोबाचा इतका लळा लागलाआहे की, पंढरपूरला जाऊन विठोबाचे दर्शन होण्याइतके सुख कशातच नाही, असे त्यांना वाटते .विठाई माझी, आमची माऊली आहे, माऊलीची भेट म्हणजे आनंद सोहळा आहे. हा सोहळा नसेल तर मी अक्षरशः ज्वाळामधे जळून जाईल आणि विठाई माऊलींची भेट झाली तर माझी सारी दुःखे पळून जातील. विठ्ठलच माझे संपूर्ण आनंद निधान आहे, हेच माझे सर्वस्व आहे. संत तुकाराम महाराजांची विठ्ठलावर असलेली निस्सीम भक्ती वरील सुंदर अभंगातून प्रकट होते. अश्या या विठोबाच्या वारीमध्ये अनेक जाति-धर्माचे लोक, भाविक मोठ्या संख्येने दरवर्षी सहभागी होत असतात.वारी एक आनंदाचा सोहळा असतो, चैतन्याचा जागर असतो, सुखाचा सागर असतो.

विठ्ठल-रखुमाईच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातील विविध गावांपासून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी सामुदायिक एक भव्य पदयात्रा म्हणजे वारी होय. वारी महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे.ही वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळा होते. आळंदी येथून संत ज्ञानेश्वर यांच्या पादुका आणि देहू येथून संत तुकाराम यांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी रथातून पंढरपूर येथे मार्गक्रमण करते. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होत. वारकरी संप्रदायात लहान मोठा अर्थात श्रीमंत गरीब असा भेद नाही. नामजपाने पुण्य मिळते हा यामागे पवित्र्य भाव आहे. एकादशी आणि इतर पवित्र दिवशी नित्यनेमाने पंढरपूरला जाणे म्हणजेच वारी होय.

जो नियमित वारी करतो तो वारकरी.वारकरी धर्मालाच भागवत धर्म म्हंटले जाते. पंढरीचा वास, चंद्रभागेस्नान, विठोबा दर्शन, लोटांगण या इच्छेपोटी वारकरी वारी शक्यतो चुकवत नाहीत. त्यामुळेच आषाढी वारी ही प्रत्येक वारकरी स्त्री पुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बाळगून आहे असे मानले जाते. या वारी निमित्ताने पुन्हा विठ्ठल नामाचा जयघोष महाराष्ट्रात सर्वत्र ऐकायला मिळतो.



## नीट परीक्षेत स्वा सावरकर कनिष्ठ महाविद्यालयाचे यश

ज्योतिर्मय साहित्य

**बीड** – नीट परीक्षा २०२५ च्या परिक्षेत स्वा सावरकर कनिष्ठ महाविद्यालयाचे चार विद्यार्थी मेडीकल प्रवेशास पात्र झाले आहेत. श्रावणी मालू ५७४ गुण, अभिजित सवासे ५५९ गुण, अमोल कुलकर्णी ५४८ गुण व कृष्णा झंवर ५४२ गुण मिळाले आहेत.




श्रावणी 574 गुण अभिजित 559 गुण आदित्य 548 गुण कृष्णा 542 गुण

सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थाचे अभिनंदन भाशिप्र संस्था अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, डॉ हेमंत वैद्य कार्यवाह, प्रा चंद्रकांत मुळे प्रशासकीय अधिकारी, विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप, स्थानिक व्यवस्था मंडळ अध्यक्ष डॉ पी के कुलकर्णी, डॉ अविनाश देशपांडे कार्यवाह, प्रमोद कुलकर्णी शालेय समिती अध्यक्ष, प्राचार्य विठ्ठल काळे, संदीप देशमुख उपमुख्याध्यापक, विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे, डॉ दीपक देशमुख सर्व संस्था पदाधिकारी, सभासद प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी केले आहे.







## साहित्य अकादमीचा यंदाचा "बाल वाङ्मय पुरस्कार" डॉ. सुरेश सावंत यांना तर युवा पुरस्काराचे मानकरी कादंबरीकार प्रदीप कोकरे



नवी दिल्ली : (विश्वास पाटील) दिल्ली येथील साहित्य अकादमीच्या कार्यालयातून भारताच्या 23 भारतीय भाषेतील यंदाचे युवा आणि बालवाङ्मय पुरस्कार जाहीर झाले. ज्यामध्ये मराठीतील ज्येष्ठ बालवाङ्मय लेखक नांदेडचे डॉ. सुरेश सावंत यांच्या "आभाळमाया"या ग्रंथाचा समावेश आहे. तसेच मराठीतील तरुण लेखक श्री प्रदीप कोकरे यांच्या "खोल खोल दुष्काळ डोळे" ह्या कादंबरीला यंदाचा युवावाङ्मय पुरस्कार जाहीर झाला आहे.

अत्यंत प्रतिष्ठेच्या अशा या पुरस्कारांमध्ये वरील दोन महत्त्वपूर्ण ग्रंथांचा व मराठी लेखकांचा समावेश आहे. डॉक्टर सावंत यांनी आजवर बालवाङ्मयात 40 पेक्षा अधिक ग्रंथांची निर्मिती करून मोठे योगदान दिलेले आहे. प्रदीप कोकरे यांनी मुंबईच्या गिरणी कामगार संपाच्या नंतरचे जीवन, वाढती बेकारी आणि ग्रामीण भागातून नगर जीवनात येऊन स्थिर होऊ पाहणाऱ्या युवकांचे जग आपल्या कादंबरीमध्ये टिपलेले आहे.

वरील दोन्ही पुरस्कार विजेत्यांचे मनापासून अभिनंदन !




# जात्यावरच्या ओव्या......

मांडवाच्या दारी
हळदी कुंकवाचा नास
आनंदाची घडी
नाही येत बारोमास ||१२९||

मांडवाच्या दारी
आहेराण भरलं डालं
गवळण बाई
तुझ माम कुळ आल ||१३०||


संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# लाईफ इज ब्युटीफुल
## (माझ्या कवडसे सोनेरी.. अंतरीचे या पुस्तकातील लेख )




ज्योतिर्मय साहित्य

अशा वेळी छोटा जोशुओ हे सगळे पाहून बावरतो. तेव्हा गुडो त्याला सांगतो की हे सगळे एका खेळाचा एक भाग आहे. यातील प्रत्येक जण खेळातील पॉईंटस मिळवण्यासाठी खेळतो आहे. तुलाही जिंकायचे असेल तर खेळाचे काही नियम पाळावे लागतील. दिवसभर लपून राहिलास तर अमुक गुण, जराही आवाज केला नाहीस तर अमुक गुण, उपाशी राहिलास तर अमुक गुण इ. जिंकलास तर खरा रणगाडा भेट म्हणून मिळेल. बिचारा निरागस जोशुओ बापाच्या बोलण्यावर विश्वास ठेवतो. आणि त्याप्रमाणे वागतो. एकदा सैनिक मुलांना अंघोळीच्या नावाने मारण्यासाठी म्हणून घेऊन जात असतात. जोशुआला अंघोळ आवडत नाही म्हणून तो लपून बसतो आणि त्याचा जीव वाचतो. असेच एकदा सैनिक गुडोला मारण्यासाठी घेऊन जातात. यावेळी जोशुआ एका पिंपात लपून बसलेला असतो. यावेळी गुडो जोशुआकडे पाहून डोळे मिचकावतो आणि सैनिकांची नक्कल करतो. अशाही परिस्थितीत त्याची विनोदी वृत्ती आणि धैर्य कायम असते. आपण मात्र या दृश्याने हेलावून जातो. पुढे दोस्त राष्ट्रांचे सैनिक येतात आणि कैद्यांची सुटका करतात. या वेळी अमेरिकन सैनिक एका रणगाड्यावर बसवून जोशुआला घेऊन जातात बिचाऱ्या जोशुआला आपल्याला खरा रणगाडा बक्षीस मिळाला आहे असेच वाटते. इतक्यात त्याला आपली आई दिसते आणि तो आपल्या आईकडे झेप घेतो.





आईच्या गळ्यात पडून तो म्हणतो, ' मम्मा, आपण जिंकलो.' डोरो आपल्या डोळ्यातील पाणी लपवित म्हणते, ' हो बेटा आपण जिंकलो. आपल्याला किनई हजार पॉईंटस् मिळाले.'

असा हा नितांतसुंदर चित्रपट. सगळ्याच्या उत्कृष्ट अभिनयाने नटलेला. जीवनातील रणरणत्या वाळवंटात सुद्धा आशेची फुले फ ुलू शकतात हे दाखवणारा. सकारात्मक संदेश देणारा. असे म्हणतात ते काही खोटे नाही. मानवी आयुष्य हे सुंदर आहेच. त्यावर प्रेम करता आले पाहिजे. मंगेश पाडगावकरांच्या शब्दात सांगायचे तर ' या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे. ' फक्त तुमच्याकडे बालकासारखे निरागस मन हवे आणि गुडोसारखी अफलातून सकारात्मक दृष्टी. प्रसिद्ध शायर निदा फाजली म्हणतात –

जितनी बुरी समझी जाती
उतनी बुरी नही है दुनिया
बच्चो के स्कूल मे तुमसे
शायद मिली नही है दुनिया.

***




दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# पादसेवन भक्ति

ज्योतिर्मय साहित्य

पूर्वपक्ष आणि सिद्धांत हे वेदांन्त शास्त्रातील विषय मांडण्याची पध्दत आहे. पूर्व पक्षामध्ये स्वस्वरूपाबद्दल शंका किंवा आक्षेप घेतला जातो. सिध्दांतात त्याचे निरसन करून स्वरूप सिध्दि केलेली असते. म्हणून समर्थ सांगतात की जी वस्तु लक्ष देऊन आतमध्ये पहावी, ध्यानामधे त्या वस्तुचे ध्यान करावे. व ते ऐवढे एकरूप होऊन जावे की ती वस्तु आपणचं होऊन जावे.


देव पहाया गेलो । देव होऊनी गेलो.

किंवा देवरूप होऊ सगळेअसेही म्हणले तर ते वावगे होणार नाही.

परमार्थामध्ये किती तरी गोष्टी आपल्याला अज्ञान असतात. द्रुष्य व्यवहारात प्रयत्न करून सर्व गोष्टी साध्य करून घेता येतात. पण सद्गुरू च्या संगतीत राहिलो तरसगळे कळते. समाधानाची अनेक अंगे आहेत. सद्गुरू ची सेवा केल्याने ती आपल्या अंगी प्रगट होऊ लागतात. म्हणून भगवंत भेटीसाठी सद्गुरु भेटणे महत्त्वाचे आहे. दिव्य वनस्पती चे सेवन करणे. विविध मंत्रांचा जप करून सिध्दि मिळवणे. यंत्रांची पूजा अर्चना करून साधना करणे. ज्ञान, भक्ति,कर्म, योगयाग हे आत्मज्ञानाचे अभ्यास विषय हाताळणे. व ज्ञानसंपन्न होणे. परमात्म वस्तुचा अभ्यास करता येत नाही कारण त्याला मीपणा अजिबात आवडत नाही. तो साधनाने साध्य होत नाही कारण साधना करणारा जीव अल्प त्याचे साधन अल्प, साधनकलाहीअल्प असते. त्याच्या विरूध्द परमात्मा सर्व बाजुने अनंत, म्हणून परमात्मा च्या ज्ञानानाचा मार्ग समजून घ्यायचा असेल तर सद्गुरू ची संतांची संगत धरावी. संतांच्या संगती शिवाय परमात्मस्वरूपाच्या अनुभवाचा विषय बोलण्यास जाऊ नये.

समर्थ म्हणतात सद्गुरूच्या चरणसेवा म्हणजे पादसेवन. व्यवहारी जगात जगत असताना देव ब्रम्हज्ञानी संत,सात्विकता, सद्भावना यांचा विसर पडू न देता जीवन जगावे. ही तर समर्थाची शिकवण आहे.

श्री राम जय राम जय जय राम जय जय रघुवीर समर्थ समास चौथा समाप्त



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# संत कसे असतात?

ज्योतिर्मय साहित्य

आपले शहाणपण बाजूला ठेवून जो संताला शरण जातो तोच खरा साधक. ज्याला सर्व सृष्टी रामरूप दिसते, आणि शिष्यालाही जो रामरूप पाहतो, तोच खरा गुरू. सद्गुरू कधीही मिंधेपणाने वागत नाही, आणि त्याला भीतीचा लवलेशही नसतो. आपला शिष्य कोणत्या आध्यात्मिक भूमिकेवर आहे हे संतांना कळते. देहबुद्धीचे लोक विषयाचे दास असतात, पण संत मात्र विषयावर मालकी गाजवतात. संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, किंवा त्याची आवड उत्पन्न झाली म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे. औषध काय आहे हे न कळतासुद्धा रोग्याने ते श्रद्धेने घेतले तर त्याला गुण येतो, किंवा एखाद्याला स्वयंपाक करता आला नाही तरी त्याला अन्नाची चव समजते आणि तो पोटभर जेवू शकतो. त्याचप्रमाणे एखाद्याला ज्ञानाचा अनुभव येईल, पण शब्दाने त्याला तो सांगता येईलच असे नाही.

मीठ खारट आहे याचे जसे आपल्याला दु:ख होत नाही, त्याचप्रमाणे जगामधल्या लढाया, हाणामाऱ्या, सज्जनांचा छळ, संकटे, यांचे संतांना वाईट वाटत नाही. 'वाईट वाटत नाही' याचा अर्थ ते त्यांना आवडते असा मात्र मुळीच नव्हे. पण मीठ जसे खारटच असणार, तशा जगात या घडामोडी होणारच, जगाची रहाटीच अशी आहे, हे समजून तो दु:ख करणार नाही. किंबहुना, मीठ फार झाले तर खारटपणा जसा सहन होत नाही, तसे त्यालाही होईल. इतकेच नव्हे, तर त्याचा प्रयत्नही जगातले वाईट कमी करण्याकडेच असतो.

विहिरीतल्या बेडकांना जशी समुद्राची कल्पना येत नाही तशी आपल्याला संतांची कल्पना येत नाही. संत हे पहिल्याने आपल्यासारखेच होते, परंतु अनुसंधानाच्या मार्गाने ते वर गेले.

आपल्याला संत 'शोधण्याची' मुळीच जरुरी नाही. आपली इच्छा बलवत्तर असेल तर संतच आपला शोध करीत आपल्याकडे चालत येतील. आपली भावना कशी आहे इकडे संतांचे लक्ष असते. संत हा गुप्तपोलिसासारखा आहे; तो आपल्यामध्ये आपल्यासारखा राहतो, पण आपल्याला ओळखता येत नाही. संताला स्वत:च्या शरीरात काय चालले आहे ते सर्व दिसते; म्हणून तो रोगाची काळजी करीत नाही. संताला कर्म मागेपुढे करता येते, पण ते टाळता येत नाही; ते कुणाला तरी भोगलेच पाहिजे. संत जे साधन सांगतात ते आपल्या शक्तीप्रमाणेच असते. संत जो बोध सांगतात, त्याचे आपण थोडेतरी पालन करू या.

संत हा जसे बोलतो तसे वागतो. आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट.

# || संत महात्म्य ||

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## महात्म्यांचा अविर्भाव

ज्योतिर्मय साहित्य

सूर्यनारायणाचा अवतार असण्याचे कारण असे की, देव आणि राक्षस यांनी केलेल्या समुद्रमंथनातून जो अमृत कुंभ निर्मित झाला, त्या अमृताचे पान करण्यासाठी, सर्व देव तत्पर झाले. पण इतक्यात तो अमृतकुंभ राक्षसानी पळवून नेला. समुद्रमंथन हे सध्याच्या थायलंड या देशात हवाई या बेटावर झाले. तिथून तो अमृतकुंभ राक्षसांनी पळवून नेला आणि छत्रपती संभाजी नगरच्या जवळील, नगर रोडवर असलेल्या, नेवासा या ग्रामी तो अमृतकुंभ घेऊन सर्व राक्षस तिथे अमृत प्राशनासाठी जमले. दुष्प्रवृत्तीचे राक्षस जर अमृत घेतील तर दृष्ट लोकांना अमरत्व प्राप्त होईल असे होऊ नये म्हणून, भगवंतांनी मोहक अशा स्त्री रूपात येऊन युक्तीने राक्षसा कडून अमृतकुंभ परत मिळविला आणि त्यांना अमृता ऐवजी मदिरा पान करविले (ही घटना नेवासा इथे घडली. आजही तिथे मोहिनी राज चे सुंदर मंदिर आहे) भगवंताचा हा मोहिनी अवतार इतका मोहित करणार होता की, अनेक देव हे भगवंत आहेत हे न जाणून, ही किती सुंदर स्त्री आहे, हे समजून तिच्यावर मोहित झाले. प्रत्यक्ष महादेवही या मोहापासून सुटू शकले नाहीत. पण सूर्यनारायण मात्र या रूपाला मोहित झाले नाहीत. उलट त्यांना मोहिनी ही आपली कन्या आहे, असा ममत्वाचा विचार त्यांचे मनात आला. ब्रह्मदेव हे सर्व पहात होते, त्यांनी सूर्यनारायणाला अविचलपणे ममत्वाचा वर्षाव करताना पाहिले आणि त्यांना असा वर दिला की, तुझ्या पोटी प्रत्यक्ष श्रीकृष्ण लक्ष्मीच्या रूपात जन्म घेतील. या वरा प्रमाणे द्वापार युगात सूर्यनारायणाचा जन्म वृष भान या नावाने झाला तर श्रीकृष्णाचेच अंग असणाऱ्या लक्ष्मीचा, राधा रूपाने आविर्भाव झाला. राधाराणी हीच मूळ प्रकृती आदी माया जगदंबा आहे. राधा राणी ही नित्य प्रभूच्या सानिध्य गो लोकात वास्तव्यास असते. ती भगवंताची ल्हादिनी शक्ती होय.ब्रह्मवेवर्त पुरणात म्हणूनच श्रीकृष्ण आणि राधा यांना नित्य युगल म्हटले आहे. प्रत्यक्ष ब्रह्मदेव यांनी या दोघांचा विवाह भांडीरवट येथे लावून देताना असे म्हटले आहे की, तुम्ही तर नित्य युगल आहात,तुमचा तसा पुन्हा विवाह लाऊन देण्याची गरजच नाही. पण या मृत्यू लोकातील लोकांना समजण्यासाठी मी तुम्हा दोघांचा विवाह रीती प्रमाणे पुन्हा लावून देतो. आणि भगवंत आणि श्री राधा राणी हे शिशु असतानाच ब्रह्मदेवाने यांचा विवाह लावून दिला होता.

द्वापार युगात ज्यांच्याजवळ सर्वाधिक गाई असत तो त्या गावाचा प्रमुख म्हणून गणल्या जाई. रावल या गावावरून कंस भय असल्याने, हे कुटुंब आणि इतर लोक, रावल येथून बरसानाकडे स्थलांतरित झाले. बरसाना हे गाव एका पर्वताच्या शिखरावर वसलेले आहे. ऋषभान यांनी तिथे स्वतःचे घर बांधले आणि तेथून राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली. त्यांच्यानंतर श्री राधा राणी ही बरसानाची राणी म्हणून मान्यता पावली. राधा राणी ही स्वतःच लक्ष्मी असल्याकारणाने बरसाणा आणि सर्वच परिसराला वैभवाचे दिवस तिच्यामुळे आले. आजही बरासाणा इथे तिच्या घराच्या जागेवरच राधा राणीचे भव्य मंदिर उभे आहे.

श्री राधा राणी ही नित्य गोलोक धामात वास्तव्य करणारी आहे.

प्रभूच्या श्री दामा नावाच्या भक्ताने श्री राधेला शाप दिला की, तुझी आणि भगवंताची शंभर वर्षा करिता ताटातूट होईल. याच श्रापास, भक्ताचा मान राखावा म्हणून, द्वापार युगात श्रीकृष्ण आणि राधा हे सकृत दर्शनी विभक्त राहिले. श्री राधेचा विवाह अनय नावाच्या व्यक्तीशी झाला होता.

अनय हा ही पूर्व जन्मी भगवत भक्त होता आणि त्यानेही पूर्वजन्मी भगवंता कडून वर प्राप्त करून घेतला होता की, माझा विवाह लक्ष्मीची होईल. त्यावेळेस वर देताना ब्रह्मदेवाने असे सांगितले की, तुझ्या तपश्चर्येच्या फळानुसार तुला वर देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे द्वापार युगात कृष्ण जेव्हा अवतार घेतील, तेव्हा श्री राधा ही तुझी पत्नी होईल. पण तू नपुसक असशील.

(क्रमशः)



# || निरूपण ||

ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं भयनाशिनि ते नमः।**
**अभयदे नमस्तुभ्यं सर्वदे ते नमो नमः।। ४१ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. भय नष्ट करणारे तुला नमस्कार असो. अभय देणारे तुला नमस्कार असो. सर्व काही देणारे, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं जानासि मे मनोरथम्।**
**त्वया विना न पूर्तिश्च तस्य भवितुमर्हति।। ४२ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझे मनोरथ जाणतेस. तुझ्या विना त्याची पुरती होणे शक्य नाही.

**जगदम्ब नमस्तुभ्यं मनो ममास्तु निर्मलम्।**
**विशुद्धहृदि मे देवि वासोऽस्तु तव सर्वदा।। ४३ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. माझे मन निर्मलअसावे. हे देवी, माझ्या विशुद्ध हृदयात तुझा सर्वदा वास असावा.

**जगदम्ब नमस्तुभ्यं सर्वत्र सिद्धिरस्तु मे।**
**मार्गे चापि सभायां च संप्रेषणे च भाषणे।। ४४ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. मार्गात, सभेत, सम्प्रेषणात, भाषणातसर्वत्र माझी सिद्धी असावी.



# आरोग्य संजीवनी

# कोथिंबीर, कांदा, लसूण यांचे आरोग्यासाठी मोठे फायदे !!

ज्योतिर्मय साहित्य

लसूण, कांदा, कोथिंबीर हे बहुतेक कुटुंबाच्या खाण्यात नेहमीच असते. सुदृढ आरोग्यासाठी त्या तिन्ही पदार्थांचे मोठे फायदे आहेत. पण, अतिसेवन केल्यास त्याचे तोटे देखील होऊ शकतात.

हृदयविकार, न्यूमोनिया, मुतखडा, अशक्तपणा, उच्च रक्तदाब, श्वसनाचे विकार, मधुमेह, क्षयरोग अशा विविध आजारांवर तिन्ही पदार्थ निश्चितच लाभदायक आहेत.

कोथिंबीर

.पचनशक्ती वाढते

कोथिंबीर पोटाच्या समस्या दूर करून पचनशक्ती वाढवते. ताज्या कोथिंबीरच्या पानांना ताकासोबत प्यायल्याने अपचन, मळमळीच्या समस्यांपासून आराम मिळतो. कोथिंबीर, हिरवी मिरची, नारळ आणि अदरकची चटणी बनवून खाल्ल्याने, अपचनामुळे पोटात होणाऱ्या वेदनांपासून आराम मिळतो. तसेच अर्ध्या ग्लास पाण्यात दोन चमचे कोथिंबीर टाकून प्यायल्याने देखील पोटदुखीपासून आराम मिळतो.

२.अशक्तपणा होईल दूर

जर तुम्हाला खूप थकल्यासारखे, अशक्त वाटत असेल किंवा चक्कर येत असतील. तर दोन चमचे कोथिंबीरीच्या रसामध्ये दहा ग्राम मिश्री (खडीसाखर) आणि अर्धी वाटी पाणी मिसळून सकाळ- संध्याकाळ प्यायल्याने थकवा, अशक्तपणा कमी होतो.

३.श्वासाचे रोग होतील दूर

कोथिंबीर श्वासासंबंधी रोगांना दूर करण्यासाठी खूप फायदेशीर असते. खोकला, दमा किंवा श्वास घेण्यास त्रास होत असल्यास कोथिंबीर आणि मिश्री (खडीसाखर) समान प्रमाणात मिळवून बारीक करा. हे मिश्रण एक चमचा भाताच्या पाण्यात मिळवून रोग्याला पाजा. काही दिवस नियमीत असे केल्याने आराम मिळेल.

४.मुतखडा, दृष्टी सुधारते

कोथिंबीर रक्तातील इन्सुलिनचे प्रमाण नियंत्रित करते. कोथिंबिरीचे सेवन मूत्रपिंडासाठी देखील खूप फायदेशीर आहे. मूत्रपिंडातील दगड अर्थात मुतखड्याच्या समस्या असलेल्यांनी कोथिंबीर पाण्यात उकळून सकाळी रिकाम्या पोटी प्या. हळूहळू मूत्रमार्गाने मुतखडा बाहेर निघून जातो. हिरवी कोथिंबीर शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल कमी होऊन चांगले कोलेस्ट्रॉल वाढवते. दृष्टी कमकुवत असलेल्यांनी निश्चितपणे कोथिंबिरीचे सेवन करावे. हिरव्या कोथिंबीरमध्येही गाजराप्रमाणे व्हिटामिन ए भरपूर असल्याने त्याचा डोळ्यांसाठी खूप फायदा होतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

कांदा -१.रोग प्रतिकारकशक्ती वाढते

कांदा शरीरात रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे काम करतो. यामध्ये फॉस्फरस, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि व्हिटॅमिन-सी असे अनेक गुण असतात, जे शरीराला निरोगी बनवण्यास तसेच इम्युनिटी वाढविण्यास मदत करतात. पचनाच्या समस्यांवर कांद्याचे सेवन फायदेशीर ठरू शकते. पचनक्रिया मजबूत करण्यासाठी आणि पोट निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही कांदा सलादच्या स्वरूपात खाऊ शकता.

२.कॅन्सरपासून होईल बचाव

कांद्यामध्ये अँटी कॅन्सर गुण देखील असतात. ते शरीरात कर्करोगाच्या पेशी वाढण्यापासून रोखत नाहीत तर त्यांचा नाशही करतात. अनेक अभ्यासांमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, जे कांदा खातात त्यांना कॅन्सरसारख्या गंभीर आजाराचा धोका कमी असतो.

(क्रमशः)

# || श्री राम कथा ||




वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

अनेक राजानी प्रयत्न केले पण धनुष्य उचलले नाही, रावणाच्या छातीवर तर ते पडले. तो रक्त बंबाळ झाला. सीता आपल्याला मिळत नाही उलट, आपला अपमान झाला, म्हणून रावण तिच्यावर रागावला.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

कोणीही राजा धनुष्यास उचलू शकला नाही तेंव्हा जनक उपरोधाने म्हणाले येथे कोणी नर पुन्गव नाही काय? सर्वांचे क्षात्र तेज विझले काय? हे ऐकून लक्ष्मण उठून उभे राहिले व क्रोधाने म्हणाले माझे बंधू इथे असताना असे कसे बोलता? रामाना हे बोलणे रुचले नाही व त्यांनी लक्ष्मणा कडे नाराजीने पाहिले.एका नजरेने लक्ष्मण शांत झाले.लक्ष्मण म्हणे दादा उठा.राम नाही म्हणाले. आपण आमंत्रित नाहीत.आपण गुरुजी सोबत आलो आहेत. मग विश्वामित्रांनी रामास सांगितले तू धनुष्य उचल. सर्वांना संधी देऊन नंतर रामाला संधी दिली. मग राम उठले गुरूजींना, जनकाना. धनुष्याला नमन केले.धनुष्यास एक प्रदक्षिणा केली. तोवर सीतेने पृथ्वी मातेस प्रार्थना केली की, आई, आत्तापर्यंत इतर राजांसाठी धनुष्य उचलताना तू तुझे सगळे गुरुत्व शक्ती धनुष्याला लाव असे मी तूला सांगितले होते म्हणून या एकाही राजास ते उचलता आले नाही. पण आता, आई आता तू तुझी शक्ती आवरून घे, आणि हे धनुष्य रामास उचलू दे, कारण तोच तुझा जावई व्हावा अशी माझी इच्छा आहे. (क्रमशः)

# फुलमाला....





नर्गिस फुल...

नर्गिस फुलाला लागते सगळ्यात पहिल्यांदा
वसंताची चाहूल,
आपल्या सुंदर रूपाची उधळण करत पडते
त्याचे पहिले पाऊल.

या सुंदर फुलाच्या मध्यभागी असतो
कपासारखा आकार आणि कडेने वेगळ्या
रंगाच्या पाकळ्या सहा,
नर्गिस फुलाच्या आकर्षक रूप आणि मंद
सुगंधामुळे मधमाशा, फुलपाखरे आणि
आपलेही मन यामध्ये दंग राहते पहा...

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

रात्र गंभीर गंभीर होत चाललेली असते. मुलांचे गाणेही थांबलेले असते. गुडूप अंधार पडलेला असतो. दूर दूर गावातील रस्त्यातून एखाद दुसरा दिवा क्वचित मधून मधून लुकलुकत असतो. पुढे तेही दिवे रस्त्यातून जायचे बंद होतात. आकाशातील तार्‍यांच्या प्रकाशाशिवाय कुठेही प्रकाश नाही दिसत. मला झोप येऊ लागते. ती येऊ लागली की मी हळूहळू उठतो आणि झोपायला जातो. नंतर बर्‍याच वेळाने केव्हातरी पूर्वेकडील दरवाज्यातून दिसणारे आकाश अंधार फिकट होत जाऊन हळूहळू उजळू लागते. जवळपासच्या झाडात एखाद दुसरी सारिका खसपस करीत असते. ढगांवर सोनेरी छटा उमटू लागते. थोड्याच वेळात साडेचारच्या घंटेचे टोल ऐकू येऊ लागतात. मी उठून पूर्वेकडील गच्चीतील दगडी चौरंगावर आसन पसरून उपासनेला बसतो. सूर्य हळूहळू वर येऊन आपल्या प्रकाशाच्या स्पर्शाने मला आशीर्वाद देतो. आजकाल अगदी सकाळीच मला न्याहरीला बसावे लागते. कारण साडेसहा वाजता आश्रमातील सर्व बालक मंडळी विद्यालयाच्या समोरील मैदानावर एकत्र होते.

तेथे कोणते ना कोणते गाणे म्हटल्यानंतर विद्यालयाचे काम सुरू होते. पहिल्या घंटेला मला वर्ग नसतो. पण त्या वेळात मी माझ्या खोलीत जाऊन शिकवायची पुस्तकं आणि टिपणही नजरे खालून घालतो. मग माझे काम सुरू होते. दिवस-रात्र चालणार्‍या माझ्या कामाचा हिशेब मी तुला दिला. किती शांतपणे दिवस जातो माझा ! मुलांसाठी हे असे काम करणे मला खूप आवडते. मी त्यांच्यासाठी हे जे काम करतो त्याला काही मोल आहे याची त्यांना कल्पना नाही. सूर्याच्या प्रकाशाचा फायदा अनायासे ती जशी घेत असतात, तशीच ती आमच्या सेवेचा फायदा घेत आहेत. पुढे ही मुले जेव्हा मोठी होतील, तेव्हा मग त्यांना येथील एक एक गोष्ट आठवू लागेल. येथील आकाशातील विपुल प्रकाश, इथे वाहणारे खुले वारे आणि सकाळी आणि संध्याकाळी झाडाखाली बसून शांतपणे देवीला केले जाणारे नमन सारे आठवेल.‘‘

सत्येंद्रनाथ टागोर हे रवींद्रनाथांचे वडीलबंधू. ते आपल्या सेवाकाळात महाराष्ट्रात जिल्हाधिकारी आणि जिल्हा न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. इंदिरादेवी ही त्यांची मुलगी. १८८५ ते १८९५ या दहा वर्षांच्या कालखंडात त्यांनी तिला अनेक पत्रे लिहिली. या काळात ते तेव्हाच्या पूर्व बंगालमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये असलेल्या आपल्या इस्टेटची देखरेख करण्यासाठी पद्मा नदीवर असलेल्या पद्मा नावाच्या बोटीमध्ये राहात आणि प्रवास करत. तेथूनच त्यांनी आपल्या महाराष्ट्रात असलेल्या या पुतणीला पत्रे लिहिली. ही सगळे पत्रे इंदिरादेवींनी जपून ठेवली आणि नंतर आपल्या स्वतःच्या हस्ताक्षरात ती लिहून काढली आणि आपल्या काकांना म्हणजेच रवींद्रनाथांना ती भेट दिली. रवींद्रनाथांनी या पुस्तकाला या पत्रांवर भाषेच्या दृष्टीने काही संस्कार करून ती पत्रे सामान्य वाचकांसाठी प्रकाशित केली. या पत्रांमधील काही कौटुंबिक उल्लेख गाळून टाकले आहेत. त्याचप्रमाणे भाषेच्या दृष्टीनेही काही पत्रांचे पुनर्लेखन केले असल्यामुळे या पत्रांना छिन्नपत्रे असे म्हटले जाते. यातील जवळपास प्रत्येक पत्रातून त्यांचे निसर्गप्रेम व्यक्त झाले आहे.

शिलाईदह येथून १७ जून १८९२ या दिवशी इंदिरेला लिहिलेले एक सुंदर पत्र आपण इथे पाहू या. पत्रातून त्यांच्यातील निसर्गप्रेमी तर दिसतोच पण तो निसर्ग त्यांना कशाप्रकारे प्रेरणा देत होता आणि त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करीत होता हेही आपल्याला बघायला मिळतं. आपल्यासाठी देखील हे पत्र खूप मार्गदर्शक आहे असं मला वाटतं.

प्रिय इंदिरा, आजकाल मी संध्याकाळच्या सुमाराला किनार्‍यावर उतरून बराच वेळ फिरतो. पूर्वेला वळल्यावर एक सुंदर दृश्य दिसतं. पश्चिमेला वळल्यावर दुसर्‍या प्रकारचं दृश्य दिसतं. आकाशातून माझ्या माथ्यावर जणू सांत्वनाची वृष्टी होत राहते. माझ्या दोन्ही डोळ्यांमधून स्वर्गमय मांगल्याची एक धारा माझ्या अंतरंगात प्रवेश करत असते. या वार्‍यात, आकाशात आणि प्रकाशात प्रतिक्षणी माझ्या मनातून जणू नवीन पालवी फुटते. मी नवीन प्राणाने आणि बलाने परिपूर्ण होऊन जातो. संसारातील सगळी काम करणं आणि लोकांशी व्यवहार करणं मला आता अगदी सहज वाटतं. खरंतर सगळंच सोपं असतं. एकच सरळ रस्ता असतो. तोच धरून चाललं की झालं. नाना प्रकारचे शॉर्टकट्स डोकं लढवून शोधण्याची मला गरज वाटत नाही. सुखदुःखं सगळ्याच मार्गांवरती असतात. कुठल्याही मार्गावर त्यांना टाळण्याचा उपाय नसतो. पण शांती केवळ या मोठ्या रस्त्यावरच असते.

(क्रमशः)



## जारणचा नवा विक्रम ! १२ दिवसांत कमावले ३.५ कोटी

ज्योतिर्मय साहित्य

सध्या मराठी चित्रपटसृष्टीत ‘जारण’ चित्रपट प्रेक्षकांच्या मनात खास स्थान मिळवत आहे. दमदार अभिनय, हृदयाला भिडणारी कथा आणि उत्तम दिग्दर्शन यामुळे चित्रपटाने केवळ १२ दिवसांत तब्बल ३.५ कोटी रुपयांची कमाई करत बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. विशेष म्हणजे, दुसर्‍या आठवड्यात केवळ विकेण्डला या चित्रपटाने तब्बल १.६५ कोटींचा गल्ला जमवला आहे, जो अलीकडच्या काळातील सर्वाधिक असल्याचे मानले जात आहे.





वर्ड ऑफ माऊथ, दमदार अभिनय, वास्तवाशी नाते सांगणारी कथा आणि उत्तम दिग्दर्शन यांच्या जोरावर ‘जारण’ने प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. अमृता सुभाष आणि अनिता दाते यांच्या सशक्त अभिनयाने या कथेला भावनिक उंची मिळाली असून, त्यांचा अभिनय पाहून प्रेक्षक भारावून गेले आहेत. सोशल मीडियावर दोघींच्या अभिनयाची आणि चित्रपटाच्या कथेची जोरदार चर्चा सुरू आहे. चित्रपटाच्या यशस्वी वाटचालीमुळे चित्रपटगृहात शोज वाढवले जात आहेत आणि प्रत्येक शोमध्ये प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद दिसून येत आहे. कथानकातील सत्यता, भावनांची खोली, आणि उत्तम सादरीकरण यामुळे चित्रपट सर्व वयोगटातील प्रेक्षकांची मने जिंकत आहे.

चित्रपटाच्या यशाबद्दल दिग्दर्शक हृषिकेश गुप्ते म्हणतात, ‘‘ ‘जारण’ सारखा संवेदनशील विषय प्रेक्षकांसमोर सादर केला, ज्याला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला याचा खूप आनंद होतो. इतक्या मोठ्या प्रमाणात प्रेक्षक, समीक्षक आणि इंडस्ट्रीतील दिग्गजांनी कथा आणि सादरीकरणाचं कौतुक केलं, हे एखाद्या दिग्दर्शकासाठी अत्यंत समाधानकारक आहे. प्रत्येक प्रतिक्रिया, प्रत्येक शाबासकी आम्हाला पुढच्या प्रवासासाठी प्रेरणा देते.’’

निर्माते अमोल भगत म्हणतात, ‘‘ चित्रपटाला मिळणार प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद पाहून मन भरून येते. थिएटर्समध्ये वाढणारे शो, बॉक्स ऑफिसवर वाढती आकडेवारी, आणि सोशल मीडियावरचा सकारात्मक प्रतिसाद हे सर्व पाहाता खरच खूप आनंद होतो. हे यश आमच्या संपूर्ण टीमच्या मेहनतीचे आहे.‘‘

अनिस बाझमी प्रॉडक्शन्स प्रस्तुत, ए अँड एन सिनेमाज, एलएलपी यांच्या सहयोगाने आणि ए३ इव्हेंट्स अँड मिडिया सर्व्हिस निर्मित ‘जारण’चे लेखन व दिग्दर्शन हृषीकेश गुप्ते यांनी केले असून अमोल भगत आणि नितीन भालचंद्र कुलकर्णी यांनी निर्मितीची धुरा सांभाळली आहे. तर मनन दानिया सहनिर्माते आहेत. चित्रपटात अभिनेत्री अमृता सुभाष व अनिता दाते यांच्या प्रमुख भूमिका असून किशोर कदम, ज्योती माळशे, विक्रम गायकवाड, राजन भिसे, अवनी जोशी, सीमा देशमुख यांचाही दमदार अभिनय पाहायला मिळत आहे.




## आनंद अनुभवता येतो

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मित्र हो-

आपल्या चंचल मनाला रसिक बनवण्याचा प्रयत्न करणे‘‘ म्हणजेच ‘‘ स्वतःसाठी वेळ देणे, हे महत्वाचे कार्य आहे‘‘. ही गोष्ट ‘‘अनेकांना कळते पण वळत नाही‘‘ अशी अवघड होऊन बसलेली आहे.

अशा स्वभावाची माणसे मग ती स्त्री असो वा पुरुष, लहान असो की मोठी, या माणसांना आपला आनंद नेमका कशात आहे ? याचा शोध घ्यावासा वाटत नाही.

यांचे जगणं ‘‘नीरस, उत्साह नसलेले , आणि मन मरगळलेले असते‘‘. पोटापाण्यासाठी नोकरी करणे ,मेहनत करणे ‘‘ आणि पारिवारिक गाडा ओढणे‘‘ या पलीकडे यांचे मन बाकी कशाचाही विचार करीत नाही . आवडीच्या गोष्टीत ज्यांना इंटरेस्ट असतो, ते त्या गोष्टी स्वतःपुरत्या करून का होईना आनंद मिळवत असतात आणि आनंदीत रहातात. पण ज्यांना कशातच इंटरेस्ट नाही, कशात गोडी नाही‘‘, ते स्वतःचा आनंद शोधण्यात खूप कमी पडतात. याला आणखी एक बाजू असते ती म्हणजे- अशी मंडळी कधी कुणात बसत नाहीत , तसेच मित्र-मंडळी, गप्पा-टप्पा, गाण्याच्या मैफिली

यातही रमत नाहीत, हे सगळ्यात असून एकटे ‘‘,अशी अवस्था करवून घेतात .

स्वतःचा असा स्वभाव बदलण्याचीही तयारी हे दाखवत नाहीत . ‘‘ ही गोष्ट त्यांच्या स्वतःसाठी नुकसानकारक आहे ‘‘ हे सांगण्यासाठी कुणी पुढाकार घेतला तर ‘‘मित्र-कर्तव्य पार पाडता येईल‘‘ . हे काम अशक्य नाही पण चिकाटीने करता येण्यासारखे आहे.

मित्र हो-

आनंद मिळवण्यासाठी नेहमी ‘‘इतरांच्या सोबतच रहावे लागते ‘‘ असे मुळीच नाही. अगदी एक-एकट्याने देखील मनाला आनंद देता येतो. ‘‘एकांत ‘‘ हा आनंद देणारी मनोवस्था आहे. स्व-संवाद,

चिंतन, मनन,योग- साधना, संगीत साधना , वाचन,लेखन ‘‘, या गोष्टी एकाग्र चित्ताने, लक्षपूर्वक करण्याचा गोष्टी आहेत.

चिंतन ,मनन, अभ्यास यातून मनाला शांती मिळते. अध्यात्मिक -विचार बैठक मनाला चिंतनशील बनवते. ग्रंथवाचन केल्याने मनाची, विचारांची उन्नती होते‘‘ या साधनेने मन एक वेगळ्या समाधानाने आनंदीत होते‘‘, यालाच आपण ‘‘आनंदाचा अनुभव घेणे ‘‘असे म्हणतो.

लेखन करणे, चित्रकलेत रमणे, संगीत साधना यासाठीचा रियाज करणे ‘‘ हे सर्व ‘‘एकट्याने करण्याच्या गोष्टी आहेत‘‘ या प्रवासातला पुढचा प्रत्येक टप्पा आपल्याला मोठा आनंद देणारा असतो.

कलावंत, खेळाडू, अभ्यासू, जिज्ञासू , ज्ञानी, विचारवंत अशी सगळीच माणसे सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत असतांना सुद्धा कायम आपल्या साधनेत, अभ्यासात व्यग्र असतात‘‘, हा एकांत त्यांना आनंद देणारा असतो.

मित्र हो - आपण ही आपल्या परीने हा आनंद अनुभवू शकतो. तुम्ही नक्की प्रयत्न करा, त्यासाठी शुभेच्छा.



# इंदापूरी निखारे

## भावनाहीन जगणे....



ज्योतिर्मय साहित्य

कधी कधी नाही तर बर्‍याच वेळा काही काही गोष्टी समजल्यानंतर खूप अस्वस्थ करतात आणि हृदयात कायमस्वरूपी आयुष्यात एखाद्या सुवर्ण क्षणासारखा तो क्षण अतिशय हळुवार पणे मनात!तो क्षण कायम लक्षात ठेवताना चांगले जगण्याचे धैर्य देतो...

एक हुरहूर...
मनाशी हितगुज करत असते...
असे काही घडले की जाणवत राहते...
तसे तर रोज अनेकजणं जन्म घेतात...
अनेकजणं मरतात...
अगदी जवळून मृत्यू तसे कोणी अनुभवत नाही...
अगदी जवळचे सोडल्यास...
आणि आता वेळ नसल्यामुळे...
जवळचे याचा अर्थ सुद्धा...
मर्यादित, किती ते सांगायची गरज नाही...
पूर्वीच्या काळी डॉक्टर खूप कमी होते...
खेडेगावात तर नसायचेच...
हॉस्पिटल वगैरे पण नसायची...
एकत्र कुटुंब...
त्यावेळी एक गोष्ट म्हणजे...
शेवटचा श्‍वास हा घरातच घेतला जायचा...
आणि शेवटचे वाक्य त्यांनी बोललेले...
पुढील पिढीच्या कायम लक्षात...
आता शेवटचे वाक्य ऐकले जातच नाही...
मध्ये...
हॉस्पिटल मध्ये...
आणि अचानक कोणी गेले...
तर त्याच्याबरोबर झालेले शेवटचे बोलणे, भेट...
प्रगत होत असतांना...
भावभावना सांभाळून ठेवणे...
कठीण होत चालले आहे...
त्यापेक्षा नाहीश्या कशा होतील याचे प्रयत्न
आपणच सर्व करत आहोत...
शेवटचे वाक्य न ऐकू येणार्‍या काळात...
कधी एकदा अंतिम श्‍वास घेतो...
याची वाट पाहण्यात...
भावभावना जपण्यासाठी असलेले शब्द नाहीसे करायचे आहेत...
माणूस म्हणून जगणं अशक्य होत चालले आहे...
जनावर म्हणून जगायला...
कशाला हवे ते शब्द...

## विश्वगुरु - डॉ.मधुसूदन घाणेकर


ज्योतिर्मय साहित्य

विश्वगुरु डॉ.मधुसूदन घाणेकर यांचा माझा गेल्या १० वर्षांपासून परिचय आहे. त्यांचे संघटनकौशल्य अनुकरणीय आहे. त्यांच्या संपर्कात येणा-या प्रत्येक व्यक्तिस ते निरपेक्ष भावनेने प्रेरणा देतात. सत्तरीत असलेल्या या व्यक्तिची विविध क्षेत्रात चालू असलेले सामाजिक आणि राष्ट्रीय बांधिलकीच्या जाणीवेतील त्यागी - समर्पण कार्य नक्कीच आदर्शवादी असे ठरणारे आहे.

२००३ मधे त्यांची बायपास झाली. कोरोना काळात मृत्युशी झुंज दिली पण अशा प्रतिकूल परिस्थितीवर त्यांनी आपल्या प्रबळ इच्छाशक्तिने मात करुन आपले राष्ट्रहित हे प्रथम अंतिम ध्येय डोळ्यासमोर ठेवून आपले अविरतपणे योगदान चालू ठेवले आहे. त्यांनी केवळ स्वतः अनेक संस्था स्थापन केल्या नाहीत तर स्वतः तन-मन-धन अर्पूण काम करीत आहेत.

बालपणापासूनच भेटेल त्या व्यक्तिला आनंद देण्याची त्यांची प्रवृत्ती आणि याच मूलभूत विचारातून डॉ.मधुसूदन घाणेकर हे विश्वजोडो अभियानाचे प्रवर्तक ठरले. शीळवादन, जुन्या हिंदी गाण्यांचे सही सही सादरीकरण, भेटेल त्याच्या सहीवरुन तात्काळ सकारात्मक सही सही स्वभाव दर्शन घडवणे, ज्योतिष शास्त्राच्या आधारे दिलासा देणे, विनोदी किस्से सांगणे, जीवनात शाश्वत आनंद मिळवण्यासाठी स्वसंकल्पनेतून साकार केलेल्या ब्रम्हध्यान तंत्राच्या सहाय्याने समुपदेशन करणे, बालांसाठी पूर्णपणे विनोदी पध्दतीने स्वनिर्मित बे दुणे चकली कार्यक्रम सादर करणे, काव्य सादरीकरण, कसदार साहित्य लेखनासाठी नवोदितांना मार्गदर्शन करणे अशा अनेक पध्दतीने डॉ.मधुसूदन घाणेकर हे मानवधर्माच्या प्रसार कार्याचा ध्यास घेत ‘‘हे विश्वची माझे घर‘‘ हे ब्रीद यशस्वी करण्यासाठी वाटचाल करीत आहेत.

त्यांनी व्यासपीठाचीच व्याख्या बदलली. स्वतःला आणि किमान दुस-या एका व्यक्तीला उभे राहण्यापुरती अथवा बसण्यापुरती असलेली जागा असणे म्हणजे झाले व्यासपीठ तयार. आणि अशा व्यासपीठावर जो भेटेल त्याला निःस्वार्थ सुसंवादातून जिंकत जिंकत त्यांचे वर्षो वर्ष विश्व जोडो अभियान चालू आहे.



डॉ.मधुसूदन घाणेकर यांचा दत्तसंप्रदायी कुटुंबात जन्म झाला. वारकरी संप्रदायातील जन्मगाव असलेल्या ताथवडे गावच्या वारकरी संप्रदायाचे त्यांच्यावर बालपणी संस्कार झाल्याने त्यांना बहुजन समाजातील समररसतेचे महात्म्य आत्मसात झाले. त्यांच्या दैदीप्यमान कार्यावर एक ओझरती नजर टाकुयात.

१९६३ पासून शीळवादन करतात.१९६५ पासून हिंदी चित्रपट गीतांचे सादरीकरण करतात. शीळवादन, गायन यांचे विश्वविक्रम झालेच पण त्यांनी नक्षत्र डॉट कॉम या लघुपटाची निर्मिती करुन त्यात कथा,पटकथा, संवाद, गीत लेखन, दिग्दर्शन, २७ अभिनेत्रींसोबत अभिनय, नेपथ्य, गायन, शीळवादन, संगीत आदि २० गोष्टींची एकट्याने जबाबदारी स्विकारुन चित्रपट क्षेत्रात नवा विश्व विक्रम प्रस्थापित केला. २५० प्रकाशित पुस्तके, १५० हून अधिक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय महत्वपूर्ण साहित्य संमेलनांसह विविध पातळीवरील परिषदांचे अध्यक्षपद, जागतिक पातळीवर टॉप १०० मधील विश्वविक्रमवीर म्हणून गौरव (२०१७) साहित्य, संपादन, लघुपट, अनुबोधपट, गायन, शीळवादन, व्यंगचित्र, एकपात्री कार्यक्रम, हस्ताक्षर मनोविश्लेषण, ज्योतिष आदि विविध क्षेत्रात ३०० विश्वविक्रम केले. १९९७ मधे हस्ताक्षर मनोविश्लेषण शास्त्र विषयक विना गाईड स्वतंत्रपणे केलेल्या हस्ताक्षर मनोविश्लेषण शास्त्र विषयक संशोधनप्रबंधास श्रीलंकेच्या ओपन इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीकडून डॉक्टरेट उपाधी प्राप्त केली. विश्व महात्मा, कर्मयोगी, परब्रम्हर्षी, ज्योतिष महामहोपाध्याय, विश्वगुरु आदि सर्वोच्च उपाध्या. २०१६ मधे १८ राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संस्थांनी संयुक्तरित्या रेग्युलस ता-यास सर डॉ.मधुसूदन घाणेकर रेग्युलस तारा हे नाव जाहिररित्या दिले.

भारतासह नेपाळ-न्यूझीलंड श्रीलंका-सिंगापूर-मलेशिया-थायलंड-दुबई- मॉरिशस, मस्कद-भूतान-व्हएटनाम - कंबोडिया, इडोनेशिया आदि २० देशात मानवधर्माच्या विश्वजोडो अभियानासोबत भेटेल त्याचे चालता बोलता हिंडता फिरत्या सबकुछ मधुसूदन ह्या एकपात्री कार्यक्रमाची आता ८३,००० व्या प्रयोगाकडे वाटचाल चालू आहे. यातील ५०,००० हून अधिक कार्यक्रम त्यांनी दिव्यांग आणि वंचितांसाठी विनामूल्य एकपात्री कार्यक्रम केले आहेत. मधुरंग, मधुस्वर, व्ही आर्ट्स, एम प्रकाशन, साहित्य गौरव, महिला ज्योतिर्विद, महिला सन्मान, मधुरंग, लाफ इंटरनॅशनल, हॅन्डरायटिंग ॲनॅलिसिस रिसर्च फाऊंडेशन, युनिव्हर्सल ॲस्ट्रॉलॉजिकल फौंडेशन, दत्तोपासक स्व.ताई घाणेकर स्मृतीमंच, ओम संमोहन, श्रीगुरु रेकी केन्द्र, सा म्युझिकल इंटरनॅशनल, फ्रेंडस इंटरनॅशनल, वर्ल्ड लिटरेचर, व्हिसल वर्ल्ड, डॉ. मधुसूदन घाणेकर ब्रह्मध्यान विश्वपीठ, समर्पण, वर्ल्ड क्वीन बीज, आदि अनेक संस्था स्थापन केल्या. डहाळी ह्या हस्तलिखित अनियतकालिकाचा विनामूल्य उपक्रम डॉ.मधुसूदन घाणेकर २००६ पासून निरपेक्ष भावनेने राबवत आहेत. शरीर जरी अधू झाले तरी मन अधू होऊ द्यायचे नाही या रहस्यानेच डॉ.मधुसूदन घाणेकर आपले प्रत्येक सत्कार्य यशस्वी करीत असल्याचे सांगतात.

डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या यशस्वी वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा !

शब्दांकन
मधुकर्णिका सारिका सासवडे
निमंत्रक, मधुस्वर, सा म्युझिकल इंटरनॅशनल पुणे.






# बारा ज्योतिर्लींगा मध्ये सर्वात मानाचा श्री.केदारेश्वर...!

ज्योतिर्मय साहित्य

रुद्रप्रयाग वरुन पहाटे निघून सकाळी ९-०० वाजता सोनप्रयाग येथे पोहचलो. तेथे मंदाकिनी व वासुकी नद्यांचा संगम आहे. मोठे वहान तेथुल वहानतळावर सोडून सर्वांना तेथून दुसऱ्या टॅक्सी द्वारे ५ कि.मी. अंतर पार करुन गौरी कुंड येथे जावे लागते. गौरी कुंड येथे बरीच दुतर्फा डेली निडसचे दुकाने आहेत.गौरी कुंड हे नांव माता पर्वतीवरुन आहे. तेथे श्रध्दाळू यात्रेकर्यां च्या स्नाना साठी एक उष्ण पाण्याचे कुंड आहे. मंदाकिनी नदीचे सर्वत्र अति शित बर्फाचे पाणी जवळच उष्ण पाण्याचे कुंड उर्जा देणारे निसर्गाचे अद्भुत व पवित्र स्थळ! पुढे केदारनाथ च्या मार्गावर घोडे पाडाव हे स्थळ आहे. तेथून पासूनच यात्रेकरुं ना पायी/ पालखी / घोडे- खेचर सवारी / पिट्टू द्वारे आमच्या फक्त डॉ.प्रमोद दोशी वगळता सर्वांनी घोडे सवारीचा आवलंब केलेला होता.


केदारनाथ पर्यंतचा १६ कि.मी. अतिशय दुर्गम व चढाईचा रस्ता पार करावा लागतो.क्षणा क्षणात निसर्गा चे वातावरण बदलत जाते. त्यामुळे उबदार कपड्यां बरोबरच रेनकोट ही बरोबर बाळगावा लागतो.पुढील कांही अंतरावर भैरव मंदिर आहे.त्याचे दर्शन करुन भाविक पुढचा मार्ग आवलंबतात.नंतर कांही अंतरावर रामपाडा भाग लागतो. तेथे पुर्वी झालेल्या जल प्रलयात राम पाड्या चा बराच भाग जल प्रवाहात वाहून गेला.त्याचे उर्वरीत अवशेष आज ही दिसतात. वाटेत कांही अंतरावर अंतरावर मृत सात घोडे दिसले होते. एका घोडे/खेचराची किंमत ४-७ लाखा पर्यंत असते. मे व जून हा भोलेनाथ यात्रेला प्रचंड गर्दी असल्याने दोन महिनेच अर्थिक प्राप्तीचा कालावधी असतो. बाकी आठ महिने घोड्यांना सांभाळावे लागते. व त्यांना चारा व खुराक देऊन संगोपन करावे लागते. त्यामुळे एका सवारीचा खर्च यात्रेकरुंना जास्त वाटते. प्रत्येक घोड्याच्या कानावर नोदणी क्रमांक नोंदवलेला असतो. चालता चालता घोड्याचे पाय घसरुन पडायचे ही प्रकार होतात.

वाटेत बरीच हॉटेल आहेत त्यामुळे चहा, नाष्ट्या ची सोय होते. वाटेत बडी लिंचोली येथे वाटसरुंच्या आरोग्याच्या सुविधा साठी हेल्त सेंटर आहे.उंच पहाडी भागात चढाई करते वेळी ऑक्सीजन कमतरतेमुळे श्वास घेण्यास त्रास होतो.त्यामुळे भीमसेनी कापूरचा वास घेतल्यावर श्वसनाचा त्रास कमी होतो. त्यामुळे सतत भीमसेनी कापुर जवळ हवा असतो. केदारनाथ मंदिरा पुर्वी ४ कि.मी.अंतरावर बेसकॅम्प आहे. तेथे राहण्याची भोजना ची सुविधा गढवाल विकास मंडळा मार्फत मापक दरात उपलब्ध असते.

त्यानंतर घोडेसवारी थांबण्या चा शेवटचा थांबा आहे. तेथून पुढील अंतर पायी जावे लागले. केदारनाथ क्षेत्रा लगतच राहाण्या साठी धर्मशाळा, होम स्टे, लॉजेस आहेत. आम्ही पुर्वी ऑन लाईन आरक्षित केलेली तिवारी लॉज शोधायला बराच वेळ लागला. शेवटी सायंकाळी ८-०० वाजता आम्ही सर्व जण फ्रेश होऊन निवांत विश्रांती घेतली. मी व डॉ.डावरे केदारनाथ मंदिरा जवळील २३ क्रमांकाचे गाळे सारखे शॉप शोधून काढले. डावरे यांच्या स्नेही मित्राच्या परिचित व्यक्ती मार्फत केदारनाथांचे दर्शन साठी चौकशी केली.त्याप्रमाणे त्यांनी सर्वांना रात्री १० वाजता शेवटची शेजआरती असते व त्यावेळी श्रध्दाळूं ची गर्दी ही फार कमी असते. तरी त्वरित तुमच्या सर्व मित्रांना तात्काळ कॉल करुन दर्शनास बोलावून घ्या.व उद्या सकाळी पूजा विधीचे पैसे भरुन माझ्याकडून आरक्षण करुन घ्या म्हणून सुचना दिली. त्याप्रमाणे दर्शना साठी कॉल करुन सर्वांना बोलावून घेऊन दर्शनचा लाभ घेतला.हे सर्व डॉ. डावरे यांच्या परिचित मित्राच्या लिंक मुळेच झाले !

नियोजन केल्या प्रमाणे सर्वांचे दर्शन रात्री १०च्या शेजारती पुर्वी झाले.भव्य दिव्य मंदिर दृष्टिस येता व भोलेनाथ चे दर्शन होताच प्रवासाचा सर्व त्राण नष्ट होतो. भव्य मंदिराच्या मध्यभागी श्री.केदारनाथ विराजमान आहेत ! मंदिराच्या मागे २०१३ मधील महाप्रलयात मंदिराचे रक्षण करणारी भिमशिलेचे दर्शन होते.भोलेनाथ एवढ्याच श्रध्देने भक्तगण भिमशिले एकच दर्शन घेतात !

भोलेनाथाचे हे मंदिर एक न उलगडलेले रहस्य आहे. केदारनाथ मंदिर कोणी बांधले याबद्दल बरेच काही सांगितले जाते. पांडवां पासून आदि शंकराचार्यां पर्यंत आजचे विज्ञान सांगते की केदारनाथ मंदिरकदाचित ८ व्या शतकात बांधले गेले असावे. तुम्ही नाही म्हटले तरी हे मंदिर किमान १२०० वर्षांपासून अस्तित्वात आहे. २१ व्या शतकात केदारनाथ ची भूमी खूप प्रतिकूल आहे. एका बाजूला २२,००० फूट उंच केदारनाथ टेकडी आहे, दुसऱ्या बाजूला २१,६०० फूट उंच कराच कुंड आहे आणि तिसऱ्या बाजूला २२,७०० फूट उंच भरत कुंड आहे.या तीन पर्वतां मधून वाहणाऱ्या पाच नद्या म्हणजे






मंदाकिनी, मधुगंगा,चिरगंगा, सरस्वती आणि स्वर्णंदरी. यापैकी काही या पुराणात लिहिलेले आहेत.हा परिसर मंदाकिनी नदी चा एकमेव पाणलोट क्षेत्र आहे. हे मंदिर एक कलाकृती आहे. हिवाळ्यात जिथे खूप बर्फ पडतो व पावसाळ्यात पाणी खूप वेगाने वाहते, तिथे या कलाकृती सारखे मंदिर बांधणे किती अशक्य काम असेल! आजही तुम्ही गाडीने त्या ठिकाणी पोहोचू शकत नाही.मग अशा ठिकाणी हे मंदिर का व कसे बांधले गेले? इतक्या प्रतिकूल परिस्थितीत १२०० वर्षांपूर्वी इतके अद्भुत मंदिर कसे बांधले जाऊ शकते? १२०० वर्षां नंतर ही, त्या भागातील प्रत्येक गोष्ट हेलिकॉप्टरने वाहून नेली जाते. आजही तिथे जेसीबी शिवाय एकही इमारत बांधता येत नाही. हे मंदिर तिथेच उभे आहे आणि ते फक्त उभेच नाही तर खूप मजबूत देखील आहे. आपण सर्वांनी एकदा तरी याचा विचार करायला हवा. शास्त्रज्ञांचा असा अंदाज आहे की जर हे मंदिर १० व्या शतकात पृथ्वीवर असते तर ते हिमयूग च्या अल्प काळात घडले असते. डेहराडून येथील वाडिया भूगर्भशास्त्र संस्थेने केदारनाथ मंदिराच्या खडकांची लिग्नोमॅटिक डेटिंग केली. दगडांचे जीवन ओळखण्यासाठी हे केले जाते. तपासणीत असे दिसून आले की १४ व्या शतका पासून ते १७ व्या शतकाच्या मध्या पर्यंत मंदिर पूर्णपणे बर्फाखाली गाडले गेले होते. तथापि, मंदिराच्या बांधकामा चे कोणतेही नुकसान झाले नाही हे अद्भूत रहस्य आहे! २०१३ मध्ये

केदारनाथ मध्ये आलेला विनाशकारी पूर सर्वांनी पाहिला असेल. या काळात सरासरीपेक्षा ३७५% जास्त पाऊस पडला. त्यानंतर आलेल्या पुरात ५,७४८ लोक (अधिकृत आकडेवारी) मृत्युमुखी पडले आणि ४,२०० गावांचे नुकसान झाले. भारतीय हवाई दलाने १ लाख १० हजारांहून अधिक लोकांना विमानाने सुरक्षित ठिकाणी पोहोचवले. सर्व काही काढून घेण्यात आले. पण इतक्या विनाशकारी पूरात सुध्दा केदारनाथ मंदिराच्या संपूर्ण रचनेवर अजिबात परिणाम झाला नाही.

भारतीय पुरातत्व संस्थे च्या मते,मंदिराच्या संपूर्ण संरचने चे ऑडिट करण्यात आले तेव्हा पूरानंतरही ते ९९% सुरक्षित असल्याचे आढळून आले. २०१३ च्या पुरात बांधकामाचे किती नुकसान झाले आणि त्याची सध्याची स्थिती काय आहे याचा अभ्यास करण्यासाठी आयआयटी मद्रास ने मंदिराची एन डी टी चाचणी केली. त्यांनी असेहीसांगितले की मंदिर पूर्णपणे सुरक्षित आणि मजबूत आहे! जर मंदिर दोन वेगवेगळ्या संस्थांनी घेतलेल्या वैज्ञानिक आणि वैज्ञानिक चाचणी मध्ये उत्तीर्ण झाले नसते, तर आजचे समीक्षक तुम्हाला काय सांगतील?

केदारनाथ मंदिर उत्तर दक्षिण स्वरूपात बांधले आहे. तर भारतात जवळ जवळ सर्व मंदिरे पूर्व पश्चिम आहेत. तज्ञांच्या मते, जर मंदिर पूर्व-पश्चिम असते तर ते आधीच नष्ट झाले असते. किंवा किमान २०१३ च्या पुरात ते नष्ट झाले असते. पण या दिशेमुळे केदारनाथ मंदिर वाचले आहे.म्हणूनच, मंदिराने निसर्गाच्या चक्रातच आपली ताकद टिकवून ठेवली आहे. मंदिराचे हे मजबूत दगड कोणत्याही सिमेंट शिवाय अश्लार पद्धतीने एकत्र चिकटवलेले आहेत. त्यामुळे दगडी सांध्या वर तापमान बदलाचा कोणता ही परिणाम न होता मंदिराची ताकद अभेद्य आहे. भारतीय लोकांनी याचा विचार केला आणि १२०० वर्षांपूर्वी त्याची चाचणी घेतली. केदारनाथ हे प्रगत भारतीय स्थापत्य कले चे एक ज्वलंत उदाहरण नाही का? २०१३ मध्ये, मंदिराच्या मागील बाजूस एक मोठा दगड अडकला आणि जल वाहिनी दुभंगली. मंदिराच्या दोन्ही बाजूंनी वेगाने वाहणाऱ्या पाण्याने सर्व काही वाहून नेले परंतु मंदिर एकआणि मंदिरात आश्रय घेतलेले लोक सुरक्षित राहिले. ज्यांना दुसऱ्या दिवशी भारतीय हवाई दलाने विमानाने आणले.


प्रश्न हा नाही की श्रद्धेवर विश्वास ठेवावा की नाही. परंतु १२०० वर्षे आपली संस्कृती आणि ताकद टिकवून ठेवणारे मंदिर बांधण्या साठी त्या जागेचा, त्याच्या दिशा निर्देशा चा, बांधकाम साहित्याचा आणि अगदी निसर्गाचा ही काळजी पूर्वक विचार करण्यातआला आहे यात शंका नाही.प्राचीन भारतीय विज्ञानाने केलेल्या प्रचंड प्रयत्नांचा विचार करून आपण आश्चर्यचकित होतो. ६ फूट उंच व्यासपीठ बांधण्यासाठी वापरलेला दगड मंदिराच्या ठिकाणी कसा आणला गेला. आज, सर्व पूरानंतर, आम्ही पुन्हा एकदा केदारनाथ च्या त्या शास्त्रज्ञांच्या बांधकामा ला नमन करतो, ज्यांना त्याच भव्यतेने बारा ज्योतिर्लिंगां मध्ये सर्वोच्च स्थान मिळवण्याचा मान मिळेल. वैदिक हिंदू धर्म आणि संस्कृती किती प्रगत होती याचे हे एक उदाहरण आहे. त्या वेळी, आपल्या ऋषी- मुनींनी, म्हणजेच शास्त्रज्ञांनी स्थापत्यशास्त्र, हवामानशास्त्र, अवकाश विज्ञान आणि आयुर्वेदात बरीच प्रगती केली होती. म्हणून आम्हाला अभिमान आहे की आम्ही भारतीय आहोत. (मध्यार्ध)

# विद्यार्थी विकास ; शिक्षकांची मेहनत गरजेची?

ज्योतिर्मय साहित्य

मुल्य म्हणजे किंमत. आपल्यात जर मुल्य असेल तर आपल्याला आपोआपच किंमत प्राप्त होत असते. मुल्य दोन प्रकारचे असू शकतात. मुल्य म्हणजे चांगले गुण व मुल्य म्हणजे वाईट गुण. मुल्य हे कोणत्याही प्रकारचे का असेना, त्याचे मोजमाप केले जाते. समजा एखादा वाईट गुण तपासायचा असेल, तर तो वाईट गुणही तपासला जावू शकतो. वाईट गुण तपासणारी माणसं वाईट असतात व चांगले गुण तपासणारी माणसं चांगलीच असतात.

शिक्षकाला चांगले गुण तपासायचे असतात. त्यासाठी तळमळ सुरु असते त्यांची. ते गुण तपासणे म्हणजेच मुल्यमापन होय. आपल्याला माहितच असेल, शोले चित्रपट. या चित्रपटात एक संवाद आहे की जो संवाद कौशल्यावर आधारीत आहे. संवाद असा की ओ सांबा, कितने आदमी थे, हा संवाद व ती सांबा विचारण्याची परिक्षा इमानदारीवर आधारीत होती.




आपणही एक शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांची परिक्षा घेतो. कशासाठी घेतो? आपण शिकविलेला भाग विद्यार्थ्यांना कितपत समजला हे पाहण्यासाठी आपण परिक्षा घेतो. त्यात आपण केवळ त्यानं लेखी चाचणीत सोडविलेले गुण पाहात नाही. गुण पाहतो, त्यानं वर्षभर केलेल्या गोष्टी. ज्याला आकारिक म्हणतात. याच मुल्यमापनाच्या दोन पद्धती. एक आकारिक मुल्यमापन व दुसरं संकलित मूल्यमापन. पुर्वी एकच मूल्यमापन पद्धती होती. संकलित मूल्यमापन. परंतु आज त्यात एक आणखी पद्धत आली, आकारिक मूल्यमापन. ज्याचा अर्थ वर्षभर मुल काय शिकलं असा होतो. एकंदरीत सांगायचं झाल्यास आकारिक परिक्षेचं मूल्यमापन का आलं? याचा विचार केल्यास मुलात जे सुप्त गुण असतात. त्यात एकाच दिवशी हवा तसा बदल होत नाही. ते गुण मुर्त स्वरुपात दिसतात. त्यात काळानुसार थोडा थोडा बदल होतो. वाढही होते. तो बदल त्या त्या वेळेला तपासणे, त्याची त्यावेळेसच नोंद घेणे. याला आकारिक मूल्यमापन म्हणता येईल. ज्यात वाढ होते.

आकारिक मुल्यमापनाची आवश्यकता काय? असा प्रश्न आपल्याला शिकवीत असतांना नेहमी पडू शकतो. तर त्याचं उत्तर आहे, मूल्यमापनातून मुलांमध्ये होत असलेला बदल आपल्याला तपासता येतो व त्याला आकार देण्याची गरज असते. म्हणूनच त्याला आकारिक मूल्यमापन म्हटलं आहे. वेळेवरच हे गुण आपल्या लक्षात आले नाही व त्याची आपण योग्य नोंद घेतली नाही, त्या परिस्थितीत योग्य मार्गदर्शन त्याला प्राप्त झाले नाही तर त्यावेळेस विद्यार्थ्यात संभ्रम निर्माण होतो आणि जेव्हा संभ्रम निर्माण होतो, तेव्हा तेच मूल अशा मार्गाकडे वळतं. जो मार्ग विनाशाकडे नेणारा असतो. त्यामुळे अशा अवस्थेत मुलाला कोणते आणि कशाप्रकारचे मार्गदर्शन करायचे? यावर प्रकाश टाकण्यासाठी आकारिक मूल्यमापन असतं. आकारिक मूल्यमापनात आपण वेळीच नोंद घेवून त्या नोंदीनुसार ते सुप्त गुण वाढविण्यास मदत करतो. ते वाढविण्यासाठी प्रयत्न करतो आणि यदाकदाचित आपल्या हातून तसे प्रयत्न झाले नाहीत तर आपल्यानंतर ते मूल ज्याच्याकडे जात असेल, तो त्या नोंदी गृहित धरुन त्यावर योग्य ते प्रयत्न करु शकतो. ज्यातून मुलात आदर्शपणा तयार होवू शकतो.

# साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त साहित्यिक प्रदीप कोकरे, डॉ.सुरेश सावंत यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून अभिनंदन

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** –साहित्यिक प्रदीप कोकरे यांच्या 'खोल खोल दुष्काळ डोळे' मराठी कादंबरीस 'साहित्य अकादमी युवा पुरस्कार' तसेच बालसाहित्यकार, शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया' काव्यसंग्रहास 'बाल साहित्य पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. साहित्य अकादमीच्या पुरस्कारांमुळे अभिजात भाषेचा दर्जा मिळालेली मराठी भाषा साहित्यिक, सांस्कृतिकदृष्ट्या अधिक समृद्ध होण्यास मदत होईल. नवीन पिढी मराठी साहित्याकडे आकर्षित होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

साहित्य अकादमीच्या वतीने वर्ष २०२५ साठीचे २४ भाषांसाठीचे 'बाल साहित्य पुरस्कार' आणि २३ भाषांसाठीचे 'साहित्य अकादमी युवा पुरस्कार' आज जाहीर करण्यात आले. पुरस्कार जाहीर झालेल्या अन्य भाषेतील साहित्यिकांचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिनंदन केले आहे. मुलांसाठी लिहितांना बालसाहित्यिकांना स्वत: मूल होऊन जगावं लागतं. मुलांचं मनोरंजन करतांना त्यांचं ज्ञानार्जनही होईल याकडे लक्ष द्यावं लागतं. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होईल, यासाठी प्रयत्न करावे लागतात. प्रयोगशील शिक्षणतज्ञ असल्याने डॉ. सुधीर सावंत यांनी ही किमया लीलया साधली आहे. त्यामुळेच त्यांचं लेखन प्रभावी ठरत आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव केला.

# ट्रीपची गोष्ट

ज्योतिर्मय साहित्य

रात्रीच्या जेवणाच्या वेळी स्वरा म्हणाली–

आई, बाबा, नाताळच्या सुट्ट्यात आमच्या वर्गाची ट्रीप शाळेने ठरवली आहे. लगेच नोंदणी करून, पैसे जमा करा असे टीचरांनी सांगितले.

आई, बाबा– मला जाऊद्या ना ट्रीपला.

आईने विचारले –ट्रीपची रूपरेषा सांगितली टिचरनी ?

स्वरा म्हणाली– हो,

छ. संभाजीनगरला मुक्काम करून– देवगिरी किल्ला, वेरूळ– घृष्णेश्वर मंदिर, कैलास लेणी, एक दिवस अजिंठा लेणी, तसेच पैठण आणि शेवटच्या दिवशी लोकल छ. संभाजीनगर. असा आहे आमचा ट्रीप-प्रोग्राम.

ट्रॅव्हलबस आहे. मुलांच्यासोबत चार मॅडम, चार सर, आणि स्कुल स्टाफची माणसे असणार आहेत.

ट्रीपमधील सर्वांची भोजन, निवासाची व्यवस्था संस्थेच्याच छ.संभाजीनगरमधील मोठ्या शाळेत करण्यात आलेली आहे.

बाबा म्हणाले–

ट्रीप, सहल, प्रवासात आपल्या खुप नवीन पाहण्यास मिळते, वेगवेगळ्या स्वभावांच्या लोकांच्या सहवासात शिकण्यास मिळते. नवीन गोष्टी कळून येतात.

तू जरूर हेअनुभव घे, तुझे नाव नोंदवूया .

आम्ही स्कुलमध्ये येऊन ट्रीपचे पैसे जमा करतो.

स्वरा खुश झाली.

ट्रीपला जाण्याचे दिवस जवळ आले तसे आईची घाई-गडबड पाहून स्वरा म्हणाली–

आई, किती टेन्शन घेतेस ग तू ?

पाच-सहा दिवसाचीच तर ट्रीप आहे आमची.

त्याची काय तयारी करायची ?

स्वराला गप्प करीत आई म्हणाली–

तू स्वतः तर काही करणार नाहीस,

आम्ही करून देतोय ना सगळी तयारी ?

तू चुपचाप बसून बघ !

बाबाही म्हणाले– स्वरा –

ट्रीप २ दिवसांची असो की महिन्याची, आपण आपल्या प्रवासाची तयारी व्यवस्थितच केली पाहिजे. रोजच्या वस्तू तर घेतल्याचं पाहिजेत. काही त्रास झाला, दुखलं-खुपलं तर हे काही मेडिसीन्स असू दे, इमर्जन्सीत उपयोग होईल.




बाबा, आई, तुम्ही किनई फारच पॅनिक होता. अति-काळजीने हैराण नि आम्हाला टेन्शन देता.

स्वराचे हे बोलणे ऐकून आई रागावत म्हणाली–

स्वरा– ही कुठली पद्धत तुझ्या बोलण्याची?

तुम्ही मुलं, सगळी सारखीच,

धड मोठी नाही ,की लहान नाही.

समजत काही नाही,

उलट बोलणे मात्र जमते तुम्हा पोरांना.

ते काही नाही, बाबा सांगतात तसे कर, हा बॉक्स तुझ्या

सैक मध्ये ठेव, वेळेवर उपयोगी पडेल.

चुपचापपणे स्वराने बॅग भरली.

बाबा म्हणाले– स्वरा, काही घेण्याचे विसरले तर ,सोबतच्या लोकांना तू मागणार आहेस का ?

मला हे द्या हो, मी विसरले !

तुझ्या अशा वागण्याने फजिती होईल , सोबतचे हसतील .

आई म्हणाली– स्वरा,

मुलांच्या काळजीपोटी आई-बाबा असेच बोलतात.

प्रवासात मोबाईलच पहात बसलीस तर प्रवास करतांना दिसणाऱ्या अनेक गोष्टी पहायच्या राहून जातील.

प्रवास म्हणजे पर्वणी, नवी गावे, नवी माणसे, चार-चौघांशी वागणे-बोलणे, हा अनुभव प्रवासात मिळत असतो.

तेव्हा खुप पहा, काय पाहिलं, त्याचे फोटो काढ.

स्वराने प्रॉमिस करीत म्हटले–

आई, सांगितलं तसेच करीन मी !

छ. संभाजीनगरला बस पोंचली, रात्रीची वेळ, मुक्कामाच्या शाळेतली छान सोय आहे हे पाहून सर ,आणि मॅडम निश्चिन्त झाले. सर्वांची जेवणे झाली.

मुली व मॅडम, सर आणि मुलं आपापल्या रूम्समध्ये गेली.

स्वराच्या रूममध्ये काही मुली आणि दोन मॅडम,दोन

मदतनीस ताई होत्या. सकाळी वेरूळला जायचे असे ठरले. प्रवास करून थकल्याने, झोप ही येत होती.

बंद दरवाजा वाजवत आहे म्हणून ताईंनी दरवाजा

उघडला, बाहेर दोन मॅडम एका मुलीला घेऊन उभ्या होत्या, आत येत म्हणाल्या..

हिला अचानक हुडहुडी भरली अंग ही तापले आहे,

जवळ दवाखनाही नाही, सकाळपर्यंत वाट पहावी लागेल

तो पर्यंत कुणाजवळ आहे का ताप कमी होण्याची गोळी?

काही मुली म्हणाल्या–

घरचे देऊ लागले, पण आम्हीच नको नको म्हणालो.

मॅडम म्हणाल्या– मी पण तीच चूक केली,

आता काय बोलू ?

स्वराने जवळचा बॉक्स उघडत म्हटले– मॅडम, ही गोळी द्या तिला, आराम पडेल लगेच. सकाळी दाखवू डॉक्टरांना.

दुसऱ्या मॅडम म्हणाल्या– बरं झालं स्वरा, तुझ्याजवळ

फर्स्ट एड बॉक्सच आहे'', छान केलंस हे.

स्वरा म्हणाली– मॅडम, मी पण न ऐकणारीच मुलगी आहे'', पण माझ्या आई-बाबांनी हा बॉक्स दिलाच.

स्वराला शाबासकी देत मॅडम म्हणाल्या– तुझ्या आई-बाबांना थँक्स सांग.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559